**-: प्रेसनोट दिनांक- १९/०९/२०२० :-**

**अभिजीत शिवाजी गुरव, पोलीस उपनिरीक्षक, रोहित राजेंद्र पोवार, पो.कॉ.ब.नं. १६४१, दोघे नेम. राजारामपुरी पोलीस ठाणे, कोल्हापूर यांनी लाचेची मागणी करून खाजगी इसम रोहित रामचंद्र सोरप यांचेमार्फत स्विकारलेबाबत.........**

---

यातील तक्रारदार प्रताप मधुकर मोरे, रा. दत्तनगर शिंगणापुर रोड, कोल्हापूर हे राजारामपुरी पोलीस ठाणे हददीत एजंटा करवी बेकायदेशीर मटका जुगार धंदा चालवितात. मागील ७/८ दिवसापुर्वी राजारामपुरी पोलीसांनी तक्रारदार यांचा मटका जुगाराचा एजंट कुणाल जगताप याचेवर रेड करुन केस केली आहे. तक्रारदार हे त्यांचे दुकानात असताना राजारामपुरी पोलीस ठाणेचे पीएसआय गुरव, पोलीस रोहित पोवार व आणखीन एक अनोळखी पोलीस असे तिघेजन दुकानात येवुन त्यांनी तक्रारदार यांना त्यांचे कार मध्ये बोलावुन घेतले. त्यावेळी पीएसआय गुरव यांनी एजंट कुणाल जगताप याचेवर दाखल असले गुन्हयामध्ये तक्रारदार यांना अटक करायचे नसेल तर ६०,००० रुपये द्यावे लागतील असे सांगितले. पोलीस रोहित पोवार व अनोळखी पोलीस यांनी गुरव साहेब जे पैसे मागत आहेत ते दयावे लागतील असे सांगुन पोलीस रोहित पोवार यांनी ते पैसे माझेकडे द्यायचे तरच यातुन सुटका होईल असे सांगीतले. त्यावेळी तक्रारदार यांनी घाबरुन लगेचच एटीएम सेंटर मध्ये जावुन तक्रारदार यांचे बॅंक खात्या मधील २०,००० रुपये काढुन पोलीस रोहित पोवार यांना आणुन दिले. त्यावर पीएसआय गुरव साहेबांनी राहिलेले ४०,००० रुपये रोहित पोवार यांचेकडे द्या असे सांगुन लाचेची मागणी केलेने तक्रारदार यांनी पीएसआय गुरव, पोलीस रोहित पोवार व अनोळखी पोलीस कर्मचारी यांचे लाचेच्या मागणीबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे तक्रार दिली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे पीएसआय गुरव, पोलीस रोहित पोवार व अन्य पोलीस कर्मचारी यांचे लाचेच्या मागणीची वेगवेगळी पडताळणी शासकीय पंच साक्षीदारांचे समक्ष केली असता, पडताळणीमध्ये पोलीस रोहित पोवार यांनी तक्रारदार यांना राजारामपुरी पोलीस ठाणे येथे दाखल मटका जुगाराच्या गुन्हयात सहआरोपी न करणेसाठी त्यांचेकडे ४०,०००/- रू. लाचेची मागणी केली. तसेच पीएसआय गुरव यांनी पोलीस रोहित पोवार यांचे मागणीप्रमाणे ४०,०००/- रू. लाचेची मागणी केली तसेच त्यांचे लाच मागणी एक अनोळखी पोलीस कर्मचारी यांनी तक्रारदार यांना लाच रक्कम देणेस प्रोत्साहन दिलेचे निष्पन्न झाले.

त्यानुसार राजारामपुरी पोलीस ठाणे परिसरात सापळा कारवाई आयोजित केली असता, तक्रारदार यांना राजारामपुरी पोलीस ठाणे येथे दाखल मटका जुगाराच्या गुन्हयात सहआरोपी न करणेसाठी पीएसआय गुरव व पोलीस रोहित पोवार यांनी खाजगी इसम प्रितम (पुर्ण नाव माहित नाही) व आणखी एका अनोळखी इसमा मार्फत लाचेची मागणी करून लाच रक्कम खाजगी इसम नामे रोहित सोरप यांचेकडे देणेस सांगीतली. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी लाच रक्कम रोहित सोरप यास लाच मागणीप्रमाणे ४०,०००/- रू. लाच रक्कम स्विकारल्याने त्यांचेवर यशस्वी सापळा कारवाई करणेत येवुन खाजगी इसम रोहित सोरप यास लाच रक्कमेसह ताब्यात घेतले आहे व इतर आरोपीचा शोध सुरू आहे. सदरबाबत तक्रारदार/फिर्यादी यांचे फिर्यादीवरून अभिजीत शिवाजी गुरव, पोलीस उपनिरीक्षक, रोहित राजेंद्र पोवार, पो.कॉ.ब.नं. १६४१, दोघे नेम. राजारामपुरी पोलीस ठाणे, कोल्हापूर ,खाजगी इसम रोहित रामचंद्र सोरप व इतर यांचेविरूध्द राजारामपुरी पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करणेची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई श्री. राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्रीमती सुषमा चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उपअधीक्षक, पोलीस निरीक्षक श्री. जितेंद्र पाटील, पोहेकॉ शरद पोरे व अजय चव्हाण, पोकॉ विकास माने,मयुर देसाई, संग्राम पाटील, रूपेश माने ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की, लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तकारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कमांकावर संपर्क साधावा.**

**१)मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१**

**२)मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.**

**३)श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९०११२२८३३३, कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.**

**४)हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४, ५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.**